# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,

17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - 01

दूरध्वनी क्र. 020-26123066/67 वेबसाईट www.mscepune.in ई-मेल mscepune@gmail.com


दरपत्रक सूचना

जा.क्र.मरापप/भांडार/Inte.Audit/2023/ 1202

दिनांक - 10 /03/2023

प्रति,

.........................

.........................

.........................

**विषय** - परिषदेचे सन 2023-2024 या वित्तीय वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे काम करण्यासाठी **"सनदी लेखापाल"** यांची नियुक्ती करणेसाठी दरपत्रक मागविणेबाबत..

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे 17, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-01 कार्यालय येथे कार्यालय कार्यरत आहे. परिषदेतील सन 2023-2024 या वित्तीय वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामे करण्यासाठी **"सनदी लेखापाल"** यांची नियुक्ती करावयाची असल्याने खालील तपशिलानुसार व नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर एकत्रित / सर्व करांसहित (रुपये) |
|---|---|---|
| 1. | पहिला त्रैमासिक अहवाल सन 2023-2024 | |
| 2. | दुसरा त्रैमासिक अहवाल सन 2023-2024 | |
| 3. | तिसरा त्रैमासिक अहवाल सन 2023-2024 | |
| 4. | चौथा त्रैमासिक अहवाल सन 2023-2024 | |
| 5. | अंतर्गत वार्षिक अहवाल सन 2023-2024 | |
| 6. | अंतर्गत लेखा परीक्षणाकरिता लेखा विषयक लेखा संहिता व म. ना. से. नियमास अधिन राहून कामकाज करावे. | |
| 7. | अंतर्गत लेखापाल यांनी सदर कामाचे फी मध्ये सर्व करांचा समावेश करावा. | |
| 8. | लेखांकनामध्ये घेतलेल्या जमा व बँक खात्यावरील प्रत्यक्ष जमा यांचा ताळमेळ घ्यावा. | |
| 9. | परिषदेचे लेखा विषयक सल्लागार म्हणून कामकाज पहावे लागेल. | |
| 10. | लेजर, रिसिट पेमेंट, इन्कम आणि एक्सपेंडिचर, बॅलेन्स शीट चे अंतर्गत लेखा परिक्षण करावे. | |
| 11. | लेखापरिक्षणात घेतलेल्या त्रुटींचे निराकरण करणेबाबत मार्गदर्शन करावे. | |
| 12. | लेखा विषयक असलेल्या अडी अडचणीबाबत योग्य ते मार्गदर्शन करावे. | |
| 13. | जी. एस. टी. रिटर्न व TDS रिटर्न भरणे, रेकॉर्ड मेन्टेन करणे. | |
| 14. | परिषदेतील अधिकारी/कर्मचारी यांचे आयकर संदर्भात फॉर्म नं.16, 24 Q चा त्रैमासिक अहवाल (वर्षात चार अहवाल) याबाबतचे आयकर संदर्भात संपूर्ण कामकाज करावे व 26 Q चा त्रैमासिक आयकर संदर्भात संपूर्ण कामकाज करावे. | |

**अटी व शर्ती -**

1. आयकर विषयक सर्व कामकाज विहीत मुदतीत पार पाडणे आवश्यक आहे.
2. सन 2023-2024 या वित्तीय वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामा व्यतिरिक्त आर्थिक बाबींविषयी सल्ला देणे आवश्यक आहे.

Internal

Scanned by CamScanner

3. दरपत्रकामध्ये भरण्यात येणारे दर अक्षरी व अंकात नमूद करावे. त्यामध्ये खाडाखोड करु नये. अपवादात्मक खाडाखोड असलेले दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
4. नमूद केलेले दर सर्व करासहित आकारलेले असावे.
5. पॅन व जीएसटी नोंदणी असणे आवश्यक आहे.
6. सनदी लेखापाल संस्था शासनाच्या काळ्या यादीमध्ये नाव असल्यास सदर संस्था अपात्र ठरविली जाईल.
7. सनदी लेखापाल यांचे कार्यालय महाराष्ट्र राज्यात, पुणे येथे असणे आवश्यक आहे.
8. सनदी लेखापालाने नमूद शासकीय कार्यालयांमध्ये अभिलेख ताळेबंद विषयक कामकाज केलेले असावे.
9. दरपत्रकासोबत सादर करण्यात आलेल्या कागदपत्रे व न्यूनतम दरानुसार संस्थेची निवड करण्यात येईल.
10. यशस्वी निविदाकासोबत रुपये 500/- रकमेच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येईल.

**दरपत्रकासोबत खालील कागदपत्रे जोडण्यात यावी.**

1. संस्था स्थापनेबाबत नोंदणीकृत प्रमाणपत्र.
2. पॅन व जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.
3. मागील दोन वर्षाचे ताळेबंद अहवाल.
4. केंद्र शासन व राज्य शासनाच्या संस्थेमध्ये किंवा सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांमध्ये काम केल्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडण्यात यावे.
5. शासन अंगीकृत संस्थामध्ये काळ्या यादीमध्ये नाव नसल्याबाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.

सदर कामासाठी भाग घेण्यासाठी इच्छूक संस्थांनी उपरोक्त निकष पूर्ण करीत असल्यास दरपत्रकासोबत कामाचा तपशिल तक्ता संस्थेनी संस्थेच्या लेटरहेडवर नमूद करुन सीलबंद लखोटा/पाकिट सादर करण्यात यावे. दरपत्रकासोबत वरील नमूद कागदपत्रे जोडण्यात यावी.

बंद पाकिटावर **परिषदेचे सन 2023-2024 या वित्तीय वर्षाचे अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामे करण्यासाठी "सनदी लेखापाल" नियुक्ती करणे दरपत्रक** असे स्पष्ट नमूद करुन दि. 16 /03/2023 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे कार्यालयात हस्तपोच / सादर करण्यात यावी. दरपत्रके उघडण्याचा दिनांक शक्य असल्यास दि.20/ 03 /2023 रोजी दुपारी 01.00 वाजता किंवा परिषदेच्या सोईनुसार उघडण्यात येईल.

टपालाव्दारे/मेलव्दारे/कुरीअर व्दारे प्राप्त दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोणतेही कारण नमूद करुन अथवा असे कारण न देता आलेल्या एक अथवा सर्व दरपत्रके स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना राहतील.

शैलजा 9/3/2023

(शैलजा दराडे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - 411001

Internal

Scanned by CamScanner